## बंध 30 दिवसांच्या कालावधीतील सामर्थ्य यादी कृतीसह विवरण
## माध्यम - मराठी

**इयत्ता -6**

## विषय - मराठी

| दिवस | अपेक्षित अध्ययन फल | अध्ययन अंश | सुचविलेल्या कृतीचे नाव | कृतीसाठी दिलेल्या सूचना |
|---|---|---|---|---|
| दिवस **1** **2** **3** | लिंग ओळखून लिंग बदल करता येणे | दिलेल्या शब्दांचे लिंग ओळखता येणे. | ओळखा पाहू मला? | विद्यार्थ्यांना गोलाकार थांबवावे व त्यांच्यासमोर दोन गोल काढावेत. एका गोलात स्त्रीलिंग व दुसऱ्या खोलात पुल्लिंग लिहावे, पुल्लिंग व स्त्रीलिंग शब्दांच्या चिठ्ठ्या विद्यार्थ्यांमध्ये वाटाव्यात, एक एक चिठ्ठी वाचून घ्यावी जर चिठ्ठीत पुल्लिंग शब्द असेल तर पुल्लिंग गोला मध्ये विद्यार्थ्यास थांबवावे जर स्त्रीलिंग असेल तर स्त्रीलिंग गोलात विद्यार्थ्यांना थांबावयास सांगावे, अशाप्रकारे कृती सुरू ठेवावी व पुल्लिंग स्त्रीलिंग<br><br>ओळखण्याची कृती करून घ्यावी. |
| | | लिंग बदल करता येणे. | आम्ही आहोत विरुद्ध लिंगी. | एक मुलगा व एक मुलगी असे विद्यार्थी, गटनायक म्हणून थांबावेत. काही शब्दांचे फ्लॅश कार्ड चित्रासह शिक्षकांनी एकेक करून विद्यार्थ्यांना दाखवावे जर शब्द 'तो' असे संबोधन करणारा असेल तर पुल्लिंग असे म्हणून मुलाकडे द्यावे. त्याचप्रमाणे ' ती ' संबोधित शब्दांना स्त्रीलिंग म्हणजे मुलीकडे द्याव्यात. यावरून विद्यार्थी स्त्रीलिंग पुल्लिंग ओळखू शकतात.<br><br>एका गटात दोन प्रमाणे विद्यार्थ्यांचे गट करावेत एका गटातील एका विद्यार्थ्याकडे पुल्लिंगी व त्याच त्याचा विरोधी लिंगी शब्दांच्या जोड्या द्याव्यात प्रत्येक गटातील विद्यार्थ्यांनी शब्दाचे लिंग सांगावे व दुसऱ्या विद्यार्थ्यांनी विरुद्ध लिंग सांगावे उदा: नमस्कार, मी आहे आई, मी स्त्रीलिंग आहे.<br>नमस्कार, मी आहे बाबा, मी पुल्लिंग आहे.<br>दोघे मिळून: आम्ही विरुद्धलिंगी आहोत. |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दिवस **4** **5** **6** | वचन ओळखणे व बदल करणे. | एकवचन व अनेकवचन ओळखणे. वचन बदल करता येणे. | वचन माझे ओळखा! | शिक्षकांनी एकवचन व अनेकवचन शब्दांचे फ्लॅश कार्ड्स बनवावेत. एक वचन शब्दांचे फ्लॅश कार्ड्स प्रत्येक विद्यार्थ्यांना द्यावे व त्याचे अनेक वचन असलेले फ्लॅश कार्ड्स टेबलावर ठेवावेत.प्रत्येक मुलाला बोलावून त्याच्या फ्लॅश कार्ड चे अनेकवचन असणारे फ्लॅश कार्ड शोधून त्याचे सादरीकरण करण्यास सांगावे अशी कृती पुढे सुरू ठेवावी. |
| | | | सांगा सांगा वचन सांगा | विद्यार्थ्यांना गोलाकार थांबवावे. एकवचन आणि अनेकवचन शब्दांचे फ्लॅश कार्ड बनवावेत. एक वचन शब्दांचे फ्लॅश कार्ड्स प्रत्येकाना द्यावे टेबलावर दोन पेट्या ठेवाव्यात एका पेटीवर एक वचन व दुसऱ्या पेटीवर अनेक वचन असे लिहावे.प्रत्येक विद्यार्थी आपला शब्द वाचेल, त्याचे वचन सांगेल व संबंधित पेटीमध्ये ते फ्लॅश कार्ड ठेवेल अशी कृती करून घ्यावी. |
| **दिवस 7** **8** **9** | वाक्यातील कर्ता, कर्म ,क्रियापद ओळखणे. | वाक्याची रचना करणे. | बनवा तरी वाक्य! | एका गटात तीन विद्यार्थी याप्रमाणे गट करावेत. शब्दांचे फ्लॅश कार्ड्स प्रत्येक विद्यार्थ्यांना द्यावेत. असे प्रत्येक गटातील फ्लॅश कार्ड्स द्याव्यात व त्यापासून वाक्य बनवून विद्यार्थ्यांकडून सांगून घ्यावी. उदाहरणार्थ  राजू, लिहितो, पत्र, सरळ वाक्य राजू पत्र लिहितो. |
| | | वाक्यातील कर्ता कर्म क्रियापद ओळखणे. | कोण? व काय? ते सांगा! | विद्यार्थ्यांचे तीन गट करावेत प्रत्येक गटाला कर्ता, कर्म ,व क्रियापद अशी अनुक्रमे नावे द्यावीत.शिक्षकांनी काही व वाक्य फलकावर लिहावित प्रत्येक वाक्य वाचून, वाक्यातील कार्य करणारा कोण? या प्रश्नांचे उत्तर येताच, कर्ता गटाला तो शब्द लिहिण्यास सांगावा. तदनंतर काय कार्य करतो? या प्रश्नाचे उत्तर त्या शब्दात येते, तो शब्द कर्म गटाला लिहिण्यास सांगावा. पुढे वाक्य पूर्ण करणारा शब्द कोणता? असे विचारावे व त्याचे उत्तर क्रियापद गटाला लिहिण्यास सांगावे. याप्रमाणे प्रत्येक गटाने अनुक्रमे आपली ओळख प्रत्येक शब्दातून सांगावे. उदा. रवी अभ्यास करतो.रवी, मी, कर्ता आहे. अभ्यास, मी,कर्म आहे.करतो, मी, क्रियापद आहे |
| दिवस **10** **11** | दिलेल्या अक्षरावरून शब्द व शब्दावरून वाक्य बनविता येणे. | वर्णमालेतील अक्षरे ओळखणे अक्षरापासून | शब्दांचे राज्य! | विद्यार्थ्यांना वर्णमालेतील अक्षरांची फ्लॅश कार्ड्स वाटावेत. क्रमात न देता क्रम बदलून द्यावे व प्रत्येक विद्यार्थ्याकडून त्याचा उच्चार व त्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | शब्द बनविता येणे व शब्दापासून वाक्य बनविता येणे. | | अक्षरा पासून बनणारे पाच शब्द विचारावे. तसेच या शब्दापासून काही वाक्य बनविण्यास सांगावी. याप्रमाणे अक्षरापासून वाक्य व वाक्य पासून शब्द बनवण्याची ही कृती करून घ्यावी. शिक्षकांनी फलकावर काही शीर्षक लिहावेत. उदा. शीर्षक. नाव, क्रियापद, गुणवैशिष्ट्ये,स्थळ,शब्द किंवा वाक्य जोडणारा, आश्चर्याने अचानक<br>ही शीर्षके लिहावीत. |
| दिवस **12** **13** **14** | शब्दांच्या जाती ओळखता येणे | शीर्षकावरून शब्दांचे वर्गीकरण करणे. | माझा समूह सांगा | अनेक शब्दांचे फ्लॅश कार्ड तयार करावेत व ते फ्लॅश कार्ड प्रत्येक विद्यार्थ्याला एक याप्रमाणे वाटावेत. विद्यार्थ्यांना ते शब्द शीर्षका प्रमाणे जोडून त्या शीर्षकाच्या खाली लिहायला सांगावे. .असे प्रत्येक शीर्षकाच्या खाली त्याचे संबंधित शब्द लिहायला सांगावेत व<br><br>कृती पूर्ण करून स्पष्टीकरण द्यावी. टीप. एका तासीकेत चार शीर्षक देऊन ही कृती करून घ्यावी. |
| | | शब्दांच्या जाती ओळखणे. | शब्दांची जात कोणती? | आठ विद्यार्थ्यांना अनुक्रमे शब्दांच्या जातींची नावे द्यावीत त्याप्रमाणे त्यांना फलक पार्टी देऊन थांबवावे.<br>राहिलेले विद्यार्थी शिक्षकांनी दिलेले शब्द पाहून तो शब्द,शब्दाच्या कोणत्या जाती मध्ये येतो? त्या विद्यार्थ्याकडे त्याने दर्शवून सांगावे.<br><br>उदा. राजा, माझी शब्दाची जात आहे नाम, मी, शब्दाची जात आहे, सर्वनाम, आहे ,माझी शब्दाची जात आहे, क्रियापद ,त्याप्रमाणे कृती पुढे सुरू ठेवावी. |
| दिवस **15** **16** **17** | पाठ्यपुस्तकातील ऐकलेल्या कथे संबंधी नीती वाचक टिप्पण ठेवणे. | नीती वाचक कथा समजून घेणे. वाचलेल्या पाठ्य अंशा मधील नीती समजून घेणे. | सांगा सांगा नीती सांगा! | विद्यार्थ्यांचे तीन गट करावे शिक्षकांनी सर्व मुलांना कोणत्याही नीतिकथा सांगाव्यात, प्रत्येक गटाकडून त्या गोष्टीची निती सांगून घ्यावी. त्यानंतर प्रत्येक गटाकडून गोष्ट सांगून घ्यावी व इतर गटांना नीती सांगण्यास सांगावी उदा. सिंह व ससा,नीती आहे, शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ.<br>पाठ्यपुस्तकातील नीती वाचत गोष्टी वाचून त्यातील नितीचे टिप्पण करण्यास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दिवस **18** **19** **20** | अपरिचित कविता समजून घेऊन सारांश लिहिता येणे. | कविता वाचून अर्थ ग्रहण करणे | माझा अर्थ सांगा! | विद्यार्थ्यांना गोलाकार थांबवावे कविता चालीत गाण्यास सांगावे त्यानंतर पहिल्या कडव्यातील एक ओळीचा अर्थ प्रत्येक विद्यार्थ्याकडून प्राप्त करून घ्यावा पहिल्या कडव्यातील नवीन शब्दांचा अर्थ शिक्षकांनी फलकावर लिहावा त्याच्या सहाय्याने विद्यार्थी कवितेचा अर्थ स्पष्ट करू शकतात. |
| | | नवीन शब्दांचा अर्थ समजून घेणे. | माझ्या सम कोण? | नवीन शब्दांचे फ्लॅश कार्ड तसेच त्याचे समानार्थी शब्दांचे फ्लॅश कार्ड्स विद्यार्थ्यांच्या दोन गटामध्ये वाटाव्यात, पहिल्या गटातून नवीन शब्द व त्याचा समानार्थी शब्द दुसरा गटातून विद्यार्थ्यांना सांगावयास सांगून, नवीन शब्दांच्या अर्थाचा संग्रह करण्याची कृती करून घ्यावी. |
| | | कंठ पाठ केलेल्या कवितेचा भावार्थ आपल्या भाषेत लिहिणे. | कल्पनाशक्ती व विचार शक्तीचा आविष्कार! | विद्यार्थ्यांना चार गटात विभागून, प्रत्येक गटात कवितेतील एक,एक कडवे देऊन त्याचा भावार्थ लिहिण्यास सांगावा व प्रत्येक गटाकडून वाचन करून घेऊन. कवितेचा सारांश लिहून घ्यावा. नवीन शब्दांचे अर्थ लिहिण्यास शिक्षकांनी मार्गदर्शन करावे. |
| दिवस **21** **22** | म्हणींचा अर्थ समजून घेऊन स्पष्ट करता येणे. | म्हणी पूर्ण करणे व संग्रह करणे दैनंदिन जीवनात म्हणीचा अर्थ समजून घेणे. | चित्र पहा म्हण पूर्ण करा | विद्यार्थ्यांचे दोन गट करून प्रत्येक प्रत्येक म्हण दोन भागात विभागा व म्हणीचा पहिला भाग एका फ्लॅश कार्ड वर व दुसऱ्या भागातील म्हण चित्राच्या सहाय्याने फ्लॅश कार्ड वर काढावी व म्हण पूर्ण करून घ्यावी. उदाहरणार्थ आयत्या बिळात..... दुसऱ्या फ्लॅश कार्ड वर सापाचे चित्र काढून दुसऱ्या गटातून ते पूर्ण करून घ्यावे. |
| | | | म्हणी पेटी! | विद्यार्थ्यांकडून दैनंदिन जीवनातील वापरत असलेल्या म्हणींचा संग्रह करून घ्यावा. |
| दिवस **23** **24** **25** | संधी व संधीचे प्रकार ओळखता येणे. | स्वर व व्यंजन यांचा परिचय करून घेणे. | वर्णमाला समजून घ्या. | विद्यार्थ्यांचे स्वर व व्यंजने असे दोन गट करावे. स्वर गटाने प्रत्येक स्वराचा उच्चार करावा तसेच व्यंजन गटाने व्यंजनाचा उच्चार करून परिचय द्यावा. नंतर व्यंजन बनण्यासाठी स्वतःची भूमिका स्पष्ट करावी. उदा .क्+ अ= क, क् +आ= का |
| | | अक्षरांचा व शब्दांचा विग्रह करता येणे. संधीचे प्रकार | सांगा माझा प्रकार व मी कसा बनतो? | शिक्षकांनी काही शब्द देऊन त्या शब्दांचे विग्रह करण्यास विद्यार्थ्यांना सांगावे, शब्दांचा विग्रह झाल्यानंतर पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण यांच्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ओळखता येणे. | | एकत्रीकरणातून तयार होणारा वर्ण यावरून संधीचे प्रकार ओळखण्यास मार्गदर्शन करावे. व विद्यार्थ्यांच्या कडून संधीचे प्रकार ओळखून घ्यावे.अनेक उदाहरणे शिक्षकांनी द्यावी.<br>उदा. सूर्योदय ==सूर्य + उदय<br>अ + उ =ओ |
| दिवस **26 27 28** | पाठ्य अंश वाचून का? काय? कसे? कोठे? या प्रश्नांची उत्तरे देता येणे. | परिच्छेद वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे. | सांगा उत्तर सांगा, उत्तर तुमचे प्रश्न आमचा! | विद्यार्थ्यांचे चार गट करावे प्रत्येक गटासाठी एक परिच्छेद देऊन त्यावर का? कोठे? काय? असे प्रश्न देऊन उत्तरे घ्यावीत. अशा अनेक प्रश्नावली तयार करून प्रश्नांची उत्तरे घ्यावीत. |
| दिवस **29 30** | विरुद्धार्थी शब्द ओळखता येणे व लिहिणे. | विरुद्धार्थी शब्द ओळखणे व लिहिणे आणि त्यांचा संग्रह करणे. | कोण माझा विरोधक? | विद्यार्थ्यांना दोन गटात विभागून, एका गटास एक शब्द व दुसऱ्या गटात त्याचा विरुद्ध अर्थाचा शब्द लिहिलेले फ्लॅश कार्ड्स द्यावेत.एका गटाने शब्द उच्चारताच दुसऱ्या गटातील त्याच्या विरुद्धार्थी शब्दाने. मी तुझा विरोधक आहे, असे सांगत त्याच्या समोर येऊन उभे रहावे व दोघांनीही आपला परिचय करून द्यावा. उदा. सत्य, असत्य मी  याचा विरोधक आहे. अशा अनेक शब्दांचे विरुद्धार्थी शब्द देऊन अशी कृती करून घ्यावी. |